# जाहीर प्रगटन

महाराष्ट्र राज्यात चालविल्या जाणाऱ्या स्पा / मसाज केंद्राकरीता मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन असून सदर मार्गदर्शक सूचनांचा मसुदा नागरीकांच्या माहितीसाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या https://medical.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर दिनांक ३ जुलै, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर मसुद्याच्या अनुषंगाने नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येत असून आजपासून दिनांक ३ ऑगष्ट, २०२५ पर्यंत खालील पत्त्यावर हरकती व सूचना सादर कराव्यात.

संचालक,
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय परिसर, पी.डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दिनांक ०३.०८.२०२५ नंतर प्राप्त होणाऱ्या सूचना विचारात घेण्यात येणार नाहीत.

श्वेप्रखडे

( श्वेतांबरी खडे )
उपसचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

स्थळ: मुंबई
दिनांक: ०३.०७.२०२५

# Spa / Massage centre Draft Guidelines

**Definition** :

1) **Spa/Massage Centre** : Spa/Massage Centre means a place/institution where massage and similar facilities (massage, manicure/pedicure/ steam etc.) are provided. These facilities are intended to be used as relaxation therapy/health enhancing measures. These are provided as outpatient treatments only and do not involve any form of medical treatment/treatment of disease. These guidelines regarding massage centres are not applicable to therapy centres and PHYSIOCENTRES attached to Government/Semi-government, Private hospitals/Dispensaries in the state of Maharashtra.

**2) License** : A license issued after all necessary inspections by the **Local Body/ any Competent Authority.**

3) **Massage** : Massage is the application of pressure , rubbing, or massaging of various parts of the body with the hands or other instruments . It is a type of treatment or relaxation technique that is useful for reducing stress , relieving muscle pain, and improving blood circulation.

4) **Manager** : This is the founder of the centre or the person responsible for controlling the operations and management of the centre. There could be more than one Manager.

5) **Therapist/ Masseur :** A person appointed to provide spa therapy/massage at the spa/massage centre who possesses the Certificate/Diploma or equivalent qualification in Spa/Massage from a recognised Board/Institution.

## Mandatory Terms/Conditions for obtaining License :

1) The Health trade License shall be issued after all necessary inspections by the Local Body/ any Competent Authority.

2) Police Verification of the Owner/Manager and staff of the Spa/Massage Centre and NOC from Fire Department shall be obtained before issuing Health Trade License to the Spa/Massage Centre along with premises verification.

3) Spas and massage centres should be allowed to operate between 7.00 am and 9.00 pm. The Licensing Authority shall have the discretion to alter the timing in special cases.

4) Centre Name, License number Details, Working hours should be displayed in Marathi and English language at the Centre premises in such a way that it is clearly visible.

5) All employees details should be maintained in the register and recorded in the computer. Police verification should be done for all employees and Police Clearance certificate for each of employee should be obtained before appointment.

6) Change in Manager/Staff- Any change in the Manager/Staff should be immediately intimated to the Licensing Authority. Before any new employee is taken, Police verification should be got done.

7) Spa / Massage Centre shall not do violation of any applicable law and rule Especially Immoral Traffic (Prevention) Act 1956.

8) Under the Prevention of Sexual Harassment of Women at Workplace Act, an internal grievance committee should be established in centres with more than 10 employees. A notice board of such a committee should be displayed in a visible area.

9) Self-declaration regarding non presence of any chronic disease as well as Consent for therapies to be carried out must be obtained from clients visiting the centre.

***10) The Spa/Massage Centre shall fulfill the following minimum criteria:***

**Minimum Criteria for Spa/Massage centres** :

| No. | Criteria | Description of Criteria |
|---|---|---|
| 1 | Spa/Massage centre Location . | The Spa / Massage Centre premises shall not function in residential area nor it shall communicate with any residential portion of the premises, if any. |
| 2 | Spa / Massage Centre. | 1. Place of massage centre, should be well-lit and ventilated.<br>2. There should be separate defined areas for Reception, Waiting area. Therapy rooms and changing rooms should be separate for Male and Female clients.<br>3. Spa / Massage Centre should have separate Toilet and Bathroom for Men and Women with appropriate drainage System.<br>4. There should be properly functional Fire extinguishing system.<br>5. There should be appropriate Waste disposal system.<br>6. A first aid kit should be available in the centre.<br>7. Spa / Massage Centre should have separate changing rooms for Male and Female employees. |
| 3 | Reception and Waiting area. | 1. Records of the details of all the clients should be maintained in the registers and it is mandatory to record in the Computers as well. Record must include their complete name verifiable contact details, complete address and valid ID proof with photograph.<br>2. Boards/leaflets providing information about the Spa/Massage centre should be available in Marathi and English at the reception counter<br>3. The Spa centre License Certificate should be displayed in Reception/ Waiting area.<br>4. The location map of the Centre, Emergency exit map, details of number of rooms available for treatment for Men and Women, working hours should be displayed at reception / waiting area.<br>5. Service Price list: A self-explanatory signboard regarding the various |

| No. | Criteria | Description of Criteria |
|---|---|---|
| | | therapies offered at the centre and their prices should be displayed in the Reception/Waiting room.<br>6. Various helpline numbers useful for customers should be displayed in the waiting area. E.g.<br>o Child Helpline -1098<br>o Women Helpline-1091<br>o Crime Stopper-1090<br>o Rescue and Relief-1070<br>o Ambulance-102,108<br>o Police Helpline-100<br>o Emergency Response Support System Number - 112 for quick response and assistance to women, children, elderly and other needy persons in case of emergencies. |
| 4 | Massage Room / Therapy Room. | 1) The therapy room should be clean with adequate space and lighting, clear drinking water facility and attached toilet and bathroom. The bathroom should have hot and cold water facilities.<br>2) There shall be separate and clearly demarcated Male and Female Spa/Massage sections in the Centre with separate entry and no interconnection.<br>3) The massage table should be of adequate dimension. There should be a separate system for steam.<br>4) Therapy rooms should have provision of self-closing doors. |
| 5 | Equipment and Products used in the massage room. | 1. Linen: The sheets and towels provided to the customer should be of good quality. Each customer should be provided with separate linen.<br>2. Disposable sheets should be placed on the massage table and disposable undergarments should be provided. But it should all be biodegradable.<br>3. Resources/Products used for therapy are FSSI / FDA approved. The products like Oils, creams, and powders used for therapy should be of good quality and properly labled. The manufacturing date and expiry date of the products should be clearly visible and the Client should be made aware of the expiry date of the product. |
| 6 | Human resources required at Massage centre. | **1. Manager:** Manager shall be In-charge of the centre and will be fully responsible for all the processes and procedures that take place there. It is mandatory for Manager to be present at the centre during all working hours.<br>2. **Masseurs:** Adequate number of male and female massage therapists should be available in the centre.<br>**3. Educational Qualification:** The Therapist/Masseur should possesses the Certificate/Diploma or equivalent qualification in |

| No. | Criteria | Description of Criteria |
|---|---|---|
| | | Spa/Massage therapy from recognized Board / Institution.<br>4. **Housekeeping staff:** Adequate number of cleaning staff should be available in the centre.<br>5. If the Spa / Massage centre has facility of Panchkarma Therapy, then registered Ayurveda Graduate must be there in the centre.<br>6. No employee working in the centre should have any criminal / civil case record / allegation under Immoral Traffic Prevention Act,1956, the Protection of Children from Sexual Offences Act. There should no pending litigation against employee in any court. This should be ensured before appointing to the centre and the employer will be solely responsible for this. |
| 7 | Code of conduct for staff | 1. All Working Employees in Spa / Massage In the centre should be above 18 years.<br>2. Every person working at the centre is required to wear the uniform and identification card provided by the employer during working hours.<br>3 Any kind of Photography, Video shooting etc. should be strictly prohibited in the premises of the centre.<br>4. All employees must maintain personal hygiene and safety. Therapist should be free from any kind infectious disease. |
| 8 | C.C.T.V cameras | CCTV cameras with recording facilities should be installed at the entrance, Reception and Waiting lobby of the centre. Recordings must be preserved for a minimum period of one year. CCTV camera system should be controlled by the Manager. |

10. An Undertaking/Declaration shall be submitted in the form of an Affidavit along with the application for obtaining the Health trade license for complying with the above conditions.

**Inspection and Enforcement-**

a) The health trade license shall be issued by the local body/ any Competent Authority only after inspection of the premises.

b) The health officials, police officers and other concerned authorities shall have the authority to inspect the premises, license, registers/all records of the Spa/massage centres to verify the compliance with the above conditions or on suspicion of commission of any offence by the licensee / employees related to any law in force.

c) In case of any violation of the guidelines, penal action shall be taken as per the applicable laws of concerned Local Body/ any Competent Authority.

d) There shall be a portal for complaint about functioning of SPA/Massage Centre. The complaint should mention the details of the complainant. Within 7 days of receipt of a complaint surprise inspection shall be carried out by Licensing Authority. If the Licensing Authority finds any wrong doing, it may lodge a complaint with the Police Authority.

**e)** In case of any criminal activity by the Spa/Massage centre, action as per law shall be taken by the Police.

# स्पा / मसाज सेंटर मार्गदर्शक तत्वे (मसुदा)

व्याख्या :

१) **स्पा / मसाज सेंटर** : स्पा / मसाज सेंटर म्हणजे अश्या जागा/ संस्था जेथे मसाज व तत्सम सुविधा ( मसाज, Manicure / Pedicure/ स्टीम इ. ) दिल्या जातात. या सुविधा relaxation थेरपी/ स्वास्थ्य वर्धक उपाय म्हणून करणे अपेक्षित आहे. या केवळ बाह्योपचार चिकित्सा म्हणून केल्या जातात. यामध्ये कोणत्याही प्रकारे औषधी चिकित्सा / आजाराच्या चिकित्सेचा अंतर्भाव होत नाही.

स्पा / मसाज सेंटर संदर्भातील उपरोक्त व्याख्या / मार्गदर्शक तत्वे ही महाराष्ट्र राज्यातील शासकीय/ निमशासकीय, खाजगी रुग्णालयांना/ दवाखान्यांना संलग्नित थेरपी सेन्टर व PHYSIOCENTRE ना लागू होत नाहीत.

२) **परवाना** : स्थानिक स्वराज्य संस्था ( local body)/ अन्य सक्षम प्राधिकारी यांनी आवश्यक त्या सर्व निरीक्षणा ( परिपूर्ण तपासणी ) नंतर दिलेला परवाना.

३) **मसाज** : मसाज म्हणजे शरीराच्या विविध भागांवर हाताने किंवा इतर साधनांनी दाब देऊन, मालिश करणे. हा एक प्रकारचा उपचार किंवा आराम देणारा उपाय आहे, जो ताण कमी करण्यासाठी, स्नायूंचे दुखणे कमी करण्यासाठी आणि रक्ताभिसरण सुधारण्यासाठी उपयोगी असतो

४) **व्यवस्थापक** : हा त्या केंद्राचा संस्थापक अथवा केंद्राच्या कामकाजावर व व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवणारा जबाबदार व्यक्ती. एकापेक्षा अधिक मॅनेजर असू शकतात.

५) **थेरपिस्ट/मसाजर:** स्पा/मसाज केंद्रात स्पा थेरपी/मसाज देण्यासाठी नियुक्त केलेली व्यक्ती ज्याच्याकडे शासनमान्य बोर्ड (मंडळ)/संस्थेतून प्राप्त केलेले स्पा/मसाजचे प्रमाणपत्र/डिप्लोमा किंवा समतुल्य पात्रता आहे.

## परवाना मिळविण्यासाठी अनिवार्य अटी/शर्ती :

१) स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारे आवश्यक असलेल्या सर्व तपासणीनंतर हेल्थ ट्रेड लायसेन्स / परवाना जारी केला जाईल.

२) स्पा/मसाज केंद्राला आरोग्य व्यापार परवाना जारी करण्यापूर्वी स्पा/मसाज केंद्राचे मालक/व्यवस्थापक आणि कर्मचारी यांचे पोलिस पडताळणी आणि परिसर पडताळणीसह अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळवावे लागेल.

३) स्पा व मसाज सेंटरना सकाळी ०७.०० वा. ते संध्याकाळी ०९.०० वा. या वेळेतच काम करण्याची परवानगी असावी. विशेष बाब म्हणून "परवाना अधिकारी" यांना विशिष्ठ ठिकाणी कामाच्या वेळेत वाढ करण्याकरिता विशेष अधिकार असेल.

४) प्रत्येक केन्द्राचे नाव, परवाना क्रमांक, परवान्याचा तपशील, कामाचे तास इ. तपशील केंद्राचे आवारात किंवा इमारतीमध्ये बाहेरून स्पष्टपणे दिसतील, अश्या पद्धतीने ***मराठी व इंग्रजी भाषेत*** प्रदर्शित केलेले असावे.

५) व्यवस्थापक / कर्मचारी यामधील बदल - व्यवस्थापक / कर्मचारी यामधील कोणताही बदल हा तत्परतेने परवाना प्राधिकरणास कळविण्यात यावा. कोणत्याही नवीन कर्मचाऱ्याची नियुक्तीपूर्वी पोलीस पडताळणी होणे आवश्यक आहे.

६) हाऊसकीपींग कर्मचाऱ्यासह सर्व कर्मचाऱ्यांचे तपशील रजिस्टरमधे / संगणकात नोंद असावेत. नियुक्ती पूर्वी सर्व कर्मचाऱ्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन करुन क्लियरन्स सर्टिफिकेट घेण्यात यावे.

७) स्पा/मसाज सेंटर कार्यरत असलेल्या ठिकाणी कोणत्याही कायद्याचे विशेषतः अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ चे उल्लंघन करणार नाही. तसेच, सर्व लागू कायदे नियम व मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे अनिवार्य आहे.

८) कामाच्या ठिकाणी महिला लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्या अंतर्गत १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असलेल्या केंद्रात "अंतर्गत तक्रार समिती" स्थापना केली जावी. अशा समितीचे फलकपत्र दर्शनीय भागी लावावे.

९) ग्राहकाने स्पा/मसाज करण्यापूर्वी त्यास कोणत्याही प्रकारचे गंभीर व्याधी नसल्याचे "स्वयंघोषित प्रमाणपत्र (Self Declaration)" सादर करणे आवश्यक आहे. तसेच, मसाज व स्पा सेंटर मध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा या स्वतःच्या जबाबदारीवर घेत असल्याचे "संमतीपत्र (Consent)" प्रत्येक ग्राहकाकडून घेणे आवश्यक आहे.

१०) <u>स्पा/मसाज सेंटरला खालील किमान निकष पूर्ण करावे लागतील-</u>

<u>स्पा/मसाज सेंटर्स स्पा करीता किमान निकष:</u>

| अ.क्र. | निकष | निकषांचे विवरण |
|---|---|---|
| १ | स्पा/मसाज सेंटरचे ठिकाण (location ) : | <u>स्पा/मसाज सेंटर हे निवासी परिसरात कार्यरत असणार नाही. किंवा त्याचा परिसराच्या कोणत्याही निवासी भागाशी संपर्क नसावा.</u> |
| २ | स्पा / मसाज सेंटर | १.मसाज सेंटरची जागा मोकळी योग्य प्रकाशयुक्त व हवेशीर असावी.<br>२.सेंटर मध्ये रिसेप्शन , वेटिंग एरिया असावेत. स्त्री व पुरुषांसाठी थेरपी रूम, Changing Room हे वेगवेगळे असावेत.<br>३.स्पा/मसाज केंद्र मध्ये योग्य ड्रेनेज सिस्टमसह पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र शौचालय व स्नानगृह असावे.<br>४. प्राथमिक अग्निशमन प्रणाली असावी( fire extinguisher).<br>५. स्पा/मसाज केंद्र मध्ये अनावश्यक / वापरण्यायोग्य नसलेल्या बाबींची/वस्तूंची विल्हेवाट लावणेकरिता योग्य व्यवस्था असावी.<br>६. सेंटर मध्ये प्रथमोपचार पेटी उपलब्ध असावी.<br>७. स्पा / मसाज सेंटर मधे पुरुष आणि महिला कर्मचाऱ्यांकरिता स्वतंत्र कपडे बदलण्याची खोली असावी. |

| अ.क्र | निकष | निकषांचे विवरण |
|---|---|---|
| ३ | रिसेप्शन व वेटिंग एरिया | १.सेंटर मध्ये येणाऱ्या ग्राहकांची नोंद रजिस्टर व संगणकामध्ये करणे अनिवार्य. सदर नोंदीमध्ये त्यांचे संपर्क तपशील, संपूर्ण पत्ता व फोटोसहीत वैध आयडी प्रूफ समावेश अनिवार्य.<br>२. स्पा/ मसाज सेंटरची माहिती देणारे फलक/ पत्रके रिसेप्शनवर मराठी व इंग्लिश भाषेत उपलब्ध असावीत<br>३. स्पा सेन्टर चा परवाना, संलग्न नोंदणीकृत डॉक्टर चे शैक्षणिक प्रमाणपत्र( degree certificate) व नोंदणी प्रमाणपत्र( registration certificate) तसेच थेरपिस्टचे शैक्षणिक प्रमाणपत्र दर्शनी भागी लावावे<br>४. आवराचा स्थळ नकाशा, emergency exit map , स्त्री व पुरुष यांच्या उपचारासाठी उपलब्ध कक्ष, संख्या, कामकाजाचे तास यांचा तपशील दर्शनी भागी लावावा<br>५. सेवा दरपत्रक : सेन्टर मध्ये होणाऱ्या विविध थेरपी व त्याचे दर यासंबंधी स्वयंस्पष्ट फलक रिसेप्शन/वेटिंग रूम मध्ये लावावे.<br>६. ग्राहकांसाठी उपयुक्त विविध हेल्पलाईन नंबर वेटिंग एरिया मध्ये प्रदर्शित करावे.<br>o Child Helpline -1098<br>o Women Helpline-1091<br>o Crime Stopper-1090<br>o Rescue and Relief-1070<br>o Ambulance-102,108<br>o Police Helpline-100<br>o Emergency Response Support System Number - 112 for quick response and assistance to women, children, elderly and other needy persons in case of emergencies. |
| ४ | मसाज कक्ष / थेरपी रूम | १) थेरपी रूम स्वच्छ असावा, पुरेशी जागा आणि प्रकाश व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि संलग्न शौचालय आणि बाथरूम असावे. स्नानगृहात गरम आणि थंड पाण्याची सुविधा असावी.<br>२) पुरुष व महिला यांच्या मसाज करिता केन्द्रामध्ये स्वतंत्र वेगवेगळे विभाग असावेत. दोन्ही ही विभागाचे प्रवेशद्वार स्वतंत्र व वेगवेगळे असून त्यामध्ये परस्पर जोडणी नसावी.<br>३) मसाज टेबल पुरेशा आकाराचे असावे._स्टीमसाठी वेगळी व्यवस्था असावी.<br>४) थेरेपी कक्षांकरीता स्वयंचलित दरवाज्यांची तरतूद असावी. |

| अ.क्र. | निकष | निकषांचे विवरण |
|---|---|---|
| ५ | मसाज कक्षात वापरली जाणारी साधन सामुग्री | १) Linen : ग्राहकाला दिली जाणारी शीट्स, टॉवेल्स हे चांगल्या दर्जाचे व स्वच्छ असावेत. प्रत्येक ग्राहकाला स्वतंत्र लिनन दिले जावे.<br><br>२) मसाज टेबल वर disposable sheets टाकली जावी disposable undergarments द्यावेत. परंतु, हे सर्व बायोडिग्रेडेबल असावे.<br><br>३) थेरपीसाठी वापरले जाणारे संसाधने/उत्पादने FSSI/FDA मान्यताप्राप्त असावीत. थेरपीसाठी वापरले जाणारे तेल, क्रीम आणि पावडर यांसारखी उत्पादने चांगल्या दर्जाची आणि योग्यरित्या लेबल केलेली असावीत. उत्पादनांची उत्पादन तारीख आणि समाप्ती तारीख स्पष्टपणे दिसली पाहिजे आणि ग्राहकाला उत्पादनाच्या मुदत समाप्तीची/ कालबाह्यता तारखेची (Expiry date) जाणीव करून दिली पाहिजे. |
| ६ | मसाज सेंटर वर आवश्यक मनुष्य बळ | १) व्यवस्थापक: स्पा/मसाज व्यवस्थापक केंद्र प्रमुख असेल आणि केंद्रामध्ये करण्यात येणाऱ्या सर्व प्रक्रिया व उपक्रम यासाठी जबाबदार असेल. व्यवस्थापकाने सर्व कामकाजाच्या वेळेत केंद्रात उपस्थित राहणे बंधनकारक आहे.<br>२) मसाजिस्ट: केंद्रात पुरेशा संख्येने पुरुष आणि महिला मसाज थेरपिस्ट उपलब्ध असले पाहिजेत.<br>३) शैक्षणिक अर्हता : थेरपीस्ट /मसाजिस्ट कडे मान्यताप्राप्त बोर्ड ( (मंडळ) /संस्था येथून प्राप्त केलेले स्पा/मसाज थेरपीमध्ये प्रमाणपत्र/डिप्लोमा किंवा समतुल्य पात्रता असावी<br>४) हाऊसकीपींग कर्मचारी: केंद्रात पुरेशा संख्येने सफाई कर्मचारी उपलब्ध असले पाहिजेत.<br>५) स्पा/ मसाज केंद्रात पंचकर्म उपचाराची सोय असल्यास, त्या ठिकाणी नोंदणीकृत आयुर्वेद पदवीधारक असणे आवश्यक आहे.<br>६) सेंटर मध्ये काम करणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्यावर कोणत्याही प्रकारच्या फौजदारी / दिवाणी खटल्याची नोंद/ आरोप असू नये तसेच अनैतिक वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६, लैंगिकतेपासून मुलाचे संरक्षण कायदा २०१२ यामध्ये प्रलंबित खटले नसावे. सेंटरवर नियुक्ती करण्यापूर्वी याची खात्री करून घ्यावी व याची सर्वस्वी जबाबदारी मालकाची राहील. |
| ७ | कर्मचारी वर्तणूक नियम ( Code of Conduct of staff) | १.स्पा / मसाज केंद्रामधे कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे वय किमान् १८ वर्ष असावे .<br>२. सेंटर वर कार्यरत प्रत्येक व्यक्तीने कामाच्या वेळामध्ये नियोक्त्याने दिलेला गणवेश व ओळखपत्र परिधान करणे आवश्यक आहे.<br>३ कर्मचाऱ्यांनी आवारात कोणत्याही प्रकारे फोटो काढणे, व्हिडिओ शूटींग इ . करण्यास सक्त मनाई असावी. |

| अ.क्र. | निकष | निकषांचे विवरण |
|---|---|---|
| | | ४. सर्व कर्मचाऱ्यांनी वैयाक्तिक स्वछता व सुरक्षितता इत्यादींवर लक्ष द्यावे , थेरपिस्ट ना कोणत्याही प्रकारचा संसर्गजन्य रोग असू नये. |
| ८ | सी. सी. टी. व्ही कॅमेरे | रेकॉर्डिंग सुविधेसह सी. सी. टी. व्ही कॅमेरे केंद्राच्या प्रवेशव्दार, स्वागत कक्ष आणि विश्राम कक्ष या ठिकाणी स्थापित केले जावे. रेकॉर्डिंग किमान १ वर्ष कालावधीपर्यंत जतन करणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही कॅमेरा सिस्टीम व्यवस्थापकाने नियंत्रित करावी. |

१०. वरील अटींचे पालन करण्यासाठी हेल्थ ट्रेंड लायसेन्स/ परवाना मिळविण्यासाठी अर्जासोबत प्रतिज्ञापत्र स्वरूपात एक हमीपत्र/घोषणा सादर करावी लागेल.

*तपासणी आणि अंमलबजावणी :*

अ) स्थानिक स्वराज्य संस्था/अन्य सक्षम प्राधिकारी हे परिसराची तपासणी केल्यानंतरच हेल्थ ट्रेंड लायसेन्स/ परवाना जारी करतील.

ब) आरोग्य अधिकारी, पोलिस अधिकारी आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांना वरील अटींचे पालन झाले आहे की नाही किंवा कोणत्याही लागू कायद्याशी संबंधित परवानाधारक/कर्मचाऱ्यांनी कोणताही गुन्हा केल्याचा संशय असल्यास स्पा/मसाज केंद्रांच्या परिसराची, परवानाधारकाची, रजिस्टरची/सर्व नोंदींची तपासणी करण्याचे अधिकार असतील.

क) मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झाल्यास, संबंधित स्थानिक संस्थेच्या /अन्य सक्षम प्राधिकारी यांच्या लागू कायद्यांनुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

ड) स्पा / मसाज केंद्राबाबत तक्रारीसाठी पोर्टल असावे. तक्रारीमध्ये तक्रारदाराचा तपशील नमूद असावा. तक्रार प्राप्तीनंतर सात दिवसाच्या आत परवाना प्राधिकरणाद्वारे केव्हाही तपासणी करण्यात यावी. काही गैरप्रकार आढळल्यास परवाना प्राधिकरणास पोलीसांकडे तक्रार करता येईल.

इ) स्पा/मसाज केंद्राने कोणतीही गुन्हेगारी कृती केल्यास, पोलिसांकडून कायद्यानुसार कारवाई केली जाईल